Publication: Sakal
Date: 3/3/2020
Page: 3
Column: 1-3

सकाळ मुंबई, मंगळवार, ३ मार्च २०२०

# ‘अदाणी इलेक्ट्रिसिटी’ला पुरस्कार

मुंबई, ता. २ : नुकत्याच झालेल्या ‘बॉयलर इंडिया २०२०’ या परिषदेत मुंबईच्या अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या डहाणू औष्णिक वीजनिर्मिती केंद्राला बेस्ट बॉयलर यूजर या प्रकारात प्रथम पारितोषिक मिळाले. कामगार विभागाला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राज्याच्या कामगार विभागाने ही परिषद आयोजित केली होती.




**मुंबई :** पुरस्कार स्वीकारताना अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या डहाणू औष्णिक वीजनिर्मिती केंद्राचे पदाधिकारी.

बॉयलरना मानांकन देताना त्याचे तंत्रज्ञान काय आहे व त्याच्या वापरामुळे सुरक्षितता व पर्यावरणाची जपणूक होते का, या बाबींचा विचार करण्यात आला. त्याचसोबत परिसर विकासासाठी कंपनी काय करते, हे मुद्देदेखील तपासण्यात आले. अदाणीच्या बॉयलरना २५ वर्षे झाल्यानंतरही त्यांची चांगली कामगिरी व अत्यंत कमी बिघाड यामुळे त्यांची विश्वासार्हता टिकून राहिली, या मुद्द्यावर अदाणीने बाजी मारली. अदाणी कंपनीच्या शेजारच्या गावांना शुद्ध पाणी पुरवणे, विहिरी खणून देणे, मुलांना शालेय वस्तूंचा पुरवठा करणे, वैद्यकीय शिबिरे घेणे आदी समाजसेवी उपक्रमांचाही विचार करण्यात आला. स्टीम बॉयलर्सचे संचालक धवल अंतापूरकर व उपसंचालक जी. डी. वानखेडे यांच्या हस्ते अदाणी डहाणू केंद्राच्या अधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.